**ठळक बातम्या**

- सर्जनशील क्षेत्रातून उभ्या राहणाऱ्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचं स्थान अतिशय महत्त्वाचं असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्र्यांचं प्रतिपादन

- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज राज्याच्या दौऱ्यावर

- थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन

- अमेरिकेने टॅरिफ लागू करायला ९० दिवसांची स्थगिती दिल्यानंतर झालेल्या घडामोडींचे भारतीय शेअर बाजारांवर सकारात्मक परिणाम

**आणि**

- प्रसिद्ध उद्योगपती मधुर बजाज यांचं निधन

**<><><><><>**

सर्जनशील क्षेत्रातून उभ्या राहणाऱ्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचं स्थान अतिशय महत्त्वाचं असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या या काळात हे स्थान अबाधित राखण्याच्या उद्देशानं वेव्हज् २०२५चं आयोजन मुंबईत होणार असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मुंबईत केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह वेव्हज् उपक्रमाच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

ही या क्षेत्रातली जगातली सर्वात मोठी परिषद असून जगभरातल्या १०० पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. हा कार्यक्रम दरवर्षी करण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची इच्छा असून तो मुंबईतच होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यासोबतच अश्विनी वैष्णव आणि देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात सध्या सुरू असलेल्या विविध रेल्वे प्रकल्पांच्या कामाचाही आढावा घेतला.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज आणि उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. आज रात्री आठ वाजता त्यांचं पुण्यात आगमन होईल. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमात ते भाग घेतील. त्यापूर्वी किल्ले रायगडाच्या पायथ्याशी  पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचं ते दर्शन घेतील. केंद्रीय गृहमंत्र्यांचा दौरा आणि छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त राज्यभरातून मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिक येण्याची शक्यता असल्यानं मुंबई गोवा महामार्गावरची वाहतून नियंत्रित करण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनाने घेतला आहे.

त्यानुसार मुंबई-गोवा महामार्गावर खारपाडा ते कशेडी दरम्यान  उद्या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे. ही बंदी पहाटे एक वाजल्यापासून ते दुपारी तीन वाजेपर्यंत असेल. या बंदीतून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना वगळले आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशच्या दौऱ्यावर आहेत. तीन हजार ८८० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन त्यांच्या हस्ते वाराणसी इथं झालं. या प्रकल्पांमध्ये वाराणसीमध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि रस्ते जोडणी प्रकल्पांचा समावेश आहे. आयुष्मान भारत वयवंदन योजनेच्या काही लाभार्थ्यांना या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी कार्डाचं वाटप केलं. थोर समाजसुधारक महात्मा

जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्त प्रधानमंत्र्यांनी आपल्या भाषणात त्यांचं स्मरण केलं…..

**होल्ड - बाईट- प्रधानमंत्री**

**<><><><><>**

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली. महात्मा फुले हे मानवतेचे खरे सेवक होते, त्यांनी समाजातल्या शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित केलं. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या निवासस्थानी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावर संदेशातून महात्मा फुले यांना अभिवादन केलं. देशातली प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी समाजव्यवस्था ही क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाईंची दूरदृष्टी, त्याग आणि परिश्रमांचे फळ आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी फुले यांना आदरांजली वाहिली. फुले यांच्या जयंतीचं औचित्य साधत पवार यांनी पुण्यातल्या गंज पेठ इथल्या महात्मा फुले वाड्याला भेट दिली. तिथं फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी फुले यांच्याशी संबधित छायाचित्रे आणि वस्तूंचा संग्रह असलेल्या संग्रहालयाची पाहणी केली. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग आणि महात्मा जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समितीनं प्रकाशित केलेल्या महात्मा फुले समग्र वाङ्मय या पुनर्मुद्रित ग्रंथाचं उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रकाशन आणि वितरण झालं.

**<><><><><>**

अमेरिकेने टॅरिफ लागू करायला ९० दिवसांची स्थगिती दिल्यानंतर झालेल्या घडामोडींचे सकारात्मक परिणाम आज भारतीय शेअर बाजारांवर झाले. बाजार सुरू झाल्यापासून ते दुपारपर्यंत ही वाढ कायम राहिली आहे. सध्या मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजारहून अधिक अंकांनी वाढून ७५ हजारच्या आसपास व्यवहार करतो आहे. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३०० पेक्षा जास्त अंकांनी वाढून २२ हजार ७००च्या आसपास व्यवहार करतो आहे. अमेरिकेने जाहीर केलेल्या आयात शुल्काला ९० दिवसांकरता स्थगिती दिल्यानंतर युरोपीय संघानंही प्रत्युत्तरात जाहीर केलेली आयात शुल्कवाढ थांबवली आहे. युरोपीयन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देल लेयेन यांनी काल समाजमाध्यमावर हा निर्णय जाहीर केला.

**<><><><><>**

वेव्हज २०२५ अंतर्गत खादीच्या वापराला उत्तेजन देण्याकरता नवकल्पना विकसित करण्यासाठी आयोजित केलेल्या मेक द वर्ल्ड वेअर खादी या स्पर्धेच्या अंतिम विजेत्यांची घोषणा करण्यात आली आहे. त्याचबरोबर इनोव्हेट टू एज्यूकेट : हॅण्डहेल्ड डिवाईस डिझाईन चॅलेंज या स्पर्धेच्या दहा विजेत्यांची घोषणाही इंडियन डिजिटल गेमिंग सोसायटीने केली आहे. हे विजेते येत्या एक ते चार मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हजच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज पदभार स्वीकारला. ही जबाबदारी दिल्याबद्दल सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे आभार मानले.

सार्वजनिक सेवेत काम करताना जनतेचा विश्वास हीच खरी ताकद मानून पुढे जाण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे. आता ही नवी भूमिका पार पाडताना देखील

प्रवाशांच्या हिताचा विचार सर्वात अग्रक्रमावर असेल, अशी ग्वाही सरनाईक यांनी पदभार स्वीकारल्यानंतर समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशातून दिली.

**<><><><><>**

एसटी कर्मचाऱ्यांचा उर्वरित ४४ टक्के पगार येत्या मंगळवारपर्यंत देण्यात येणार आहे. एसटी कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याचं फक्त ५६ टक्के वेतन मिळाल्याचं वृत्त पसरल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांमधे याबाबत नाराजी होती. उपमुख्यमंत्री शिंदे सोलापूर जिल्ह्यात सांगोला इथं दौऱ्यावर असताना त्यांची काही एसटी कर्मचाऱ्यांनी भेट घेऊन आपले उर्वरित वेतन लवकरच देण्याची मागणी केली होती. त्यानंतर शिंदे यांनी राज्याचे वित्त सचिव ओमप्रकाश गुप्ता यांच्याशी फोनवरून चर्चा केली. त्यावेळी कर्मचाऱ्यांचे या महिन्याचे उर्वरित ४४ टक्के वेतन येत्या मंगळवारपर्यंत अदा करण्यात येईल असे गुप्ता यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

प्रसिद्ध उद्योगपती मधुर बजाज यांचं आज पहाटे मुंबईत निधन झालं. ते ६३ वर्षांचे होते. गेले काही दिवस मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. देशातल्या अग्रणी दुचाकी वाहन उद्योग बजाज ऑटोचे ते मानद संचालक होते. त्याखेरीज महाराष्ट्र स्कूटर लिमिटेड चे अध्यक्ष होते. बजाज उद्योगसमूहातल्या इतर कंपन्यांमधेही ते संचालकपदावर होते. प्रसिद्ध उद्योगपती जमनालाल बजाज यांचे ते नातू होते तर रामकृष्ण बजाज यांचे पुत्र होते. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी बजाज यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना आदरांजली वाहिली.

**//<><><><><>//**